The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# मराठी संतांचे ऐतिहासिक व सांस्कृतिक कार्य

**प्रा . डॉ . एच . टी. सातपुते**

इतिहास विभाग प्रमुख तथा सहयोगी प्राध्यापक, माधवराव पाटील महाविद्यालय पालम,

**प्रस्तावना:**

महाराष्ट्राची ओळख देशभर संतांची भूमी म्हणून आहे .महाराष्ट्रात आठव्या शतकापासून विविध संप्रदायातील संतांनी आपल्या साहित्य व प्रबोधनात्मक कार्यातून जनमानसाचे भौतिक व आध्यात्मिक जीवन उन्नत करण्याचा प्रयत्न केलेला आहे . बौद्ध धम्माच्या ऱ्हासानंतर नाथ संप्रदायातील नऊ नाथांनी महाराष्ट्रातील सामान्य जनतेत आध्यात्मिक समता प्रस्थापित करण्यासाठी समाजातील तळागाळात जाऊन श्रम करणाऱ्या माणसांना ईश्वर आणि अध्यात्म समजावून सांगितले होते . नाथ संप्रदायाच्या प्रभावातून महाराष्ट्रात महानुभव आणि वारकरी संप्रदायाची निर्मिती होऊन या दोन्ही संप्रदायांनी केलेले कार्य सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या ऐतिहासिक अशा स्वरूपाचे राहिलेले आहे . महानुभव संप्रदायातील चक्रधर आणि वारकरी संप्रदायातील नामदेव या दोन संतांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रभाव महाराष्ट्रच नाही तर संपूर्ण देशभर सामान्य माणसांना प्रेरणा देणारा ठरला . धर्मसत्ता व ज्ञान सत्ता विशिष्ट लोकांच्या मालकीची असताना १८ पगड जातीमध्ये या दोन संतांनी धर्म आणि ज्ञान याचा प्रचार व प्रसार करून अनेकांना लिहिते व बोलते केले . धर्म म्हणजे केवळ माणसाला अध्यात्म देणारी शक्ती नाही तर त्याचे सांस्कृतिक व सामाजिक कर्तृत्व वृद्धिंगत करणारी बाब आहे, हे या दोन्ही महापुरुषांनी सिद्ध केले .

"लोककल्याणाच्या जिवंत व जातीवंत तळमळीने प्रेरित होऊन बौद्ध व जैन धर्माच्या आद्य प्रवर्तकांनी संस्कृतला झिडकारले आणि लोक भाषेला जवळ केले ; त्याचप्रमाणे त्याच हेतूने प्रेरित होऊन महाराष्ट्रात भक्ती मार्गाचा जयजयकार घडून आणणाऱ्या ज्ञानदेव - नामदेव प्रभृती संतांनी संस्कृतला बाजूला सारून मराठीला जवळ केले यातील साम्य अतिशय महत्त्वाचे आहे . " (१) हे प्राचीन साहित्याचे इतिहासकार अ .ना . देशपांडे यांचे मत अतिशय महत्त्वाचे आहे .

संतांचा लढा केवळ आध्यात्मिक नव्हता तर तो भाषिक सुद्धा होता . कुठलीही लोकभाषा अभिजन वर्गात अव्हेरली जाते . पण अध्यात्मिक उन्नती सोबत ऐहिक विकासाचा पुरस्कार करणाऱ्या देशातील विविध धर्म आणि संप्रदायांनी लोक भाषेला अनन्यसाधारण असे महत्त्व दिलेले आहे . त्याचे कारण असे की, आपल्या विचार आणि वाणीतून प्रकट होणाऱ्या ज्ञानाचा उपयोग समाजातील शेवटच्या माणसालाही झाला पाहिजे . ही भूमिका या संप्रदायातील विविध संतांनी स्वीकारली होती .

ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देताना भगवद् गीतेतील तत्त्वज्ञानाचा प्राकृत म्हणजेच मराठी भाषेत 'भावार्थदीपिका ' नावाचा अत्यंत सुंदर असा ग्रंथ लिहून त्यांनी मराठी भाषेला प्राप्त करून दिलेले वैभव ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे . "ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मराठी भाषेत जसा कालाने तसा योग्यतेनेही पहिलाच आहे . धर्मग्रंथ म्हणून , काव्य म्हणून, व्यवहार नीती शिकविणारा म्हणून . " ( २ ) म्हणून ज्ञानेश्वराच्या ओवी आणि अभंगाचा प्रभाव

महाराष्ट्रातील मराठी माणसांच्या अंतःकरणावर खोलवर पडलेला आहे . आध्यात्मिक तत्त्वज्ञान आणि व्यवहार जनमानसाला समजावून सांगण्यासाठी त्यांनी वापरलेली भाषा आजही मराठी सांस्कृतिक व्यवहारात अत्यंत महत्त्वाची मानली जाते .

वारकरी संप्रदायातील अत्यंत महत्त्वाचे प्रवर्तक संत म्हणून संत नामदेव यांचा उल्लेख केला जातो . संत नामदेव हे केवळ लिहिणारे कवी संत नव्हते तर ते उत्कृष्ट संघटक आणि वक्ते म्हणूनही संपूर्ण देशभर प्रसिद्ध होते . मराठी आणि हिंदी भाषेत पद्यरचना करून नामदेवाने केलेले ऐतिहासिक कार्य संपूर्ण देशाला अध्यात्मिक एकतेमध्ये बांधणारे आहे . तर आध्यात्मिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी तळागाळातील जातींमध्ये जाऊन तेथील प्रतिभावंत लोकांना लिहिते आणि बोलते केले . हे त्यांचे ऐतिहासिक कार्य भारतीय संस्कृतीक इतिहासात दैदिप्यमान असे आहे . देशपातळीवर गुरुनानक ,संत रविदास आणि संत कबीर या दिग्गज महापुरुषांना आपल्या सोबत घेऊन प्रेरणा देत त्यांनी अध्यात्मिक व सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा केलेला प्रयत्न वर्तमान कालखंडातही महत्त्वपूर्ण असाच आहे .

संत नामदेवाच्या कार्याचा महाराष्ट्र म्हणजेच मराठी भाषेपुरता विचार केला तर एक बाब ठळकपणे आपल्या लक्षात येते. आलूतेदार आणि बलुतेदार या वर्गातील लोकांचा , कुणबी आणि अस्पृश्य समाजातील अनेकांना त्यांनी संत होण्यासाठी प्रेरणा दिली . संत जनाबाई, संत चोखामेळा, संत गोरा कुंभार , सावता माळी ,संत कान्होपात्रा या संतांच्या जाती जरी समजून घेतल्या तरी त्यांचे सामाजिक स्थान आपल्या लक्षात येते . अशा लोकांना प्रेरणा देत असतानाच संत नामदेवांनी विज्ञानवादी दृष्टिकोनातून अध्यात्माची मांडणी करण्याचा केलेला प्रयत्न अत्यंत महत्त्वाचा आहे .

"मीच माझा देव मीच माझा भक्त ।
मी माझा कृतार्थ सहज असे ॥ १ ॥
बंध आणि मोक्ष मायेची कल्पना ।
पडली होती मना भ्रांती कैसी ॥ २ ॥ " ( ३ )

हा संत नामदेवाचा विचार महाराष्ट्रातील जातिभेदाला मोडून टाकणारा ठरला यातूनच महाराष्ट्रातील सांस्कृतिक व सामाजिक जीवनासह राजकीय इतिहासाला वेगळी कलाटणी मिळालेली दिसते . पंढरपूरचा विठ्ठल केवळ ईश्वराची मूर्ती नाही तर तो या अठरापगड जातीतील लोकांना त्यांच्यातील भेद भाव मिटवून सर्वांना अध्यात्माच्या पातळीवर एक करणारी शक्ती आहे हेच या संतांनी आपल्या कार्यातून आणि विचारातून सिद्ध केलेले आहे .

संत नामदेवाच्या अभंगाच्या प्रेरणेतून सोळाव्या शतकात संत तुकारामांनी प्रेरणा घेतलेली आपल्याला दिसते . संत तुकाराम विचार आणि वाणी या पातळीवर त्यांनी संत नामदेवांच्या पुढे एक पाऊल टाकून संपूर्ण महाराष्ट्राला विज्ञानवादी अध्यात्म शिकविण्याचा केलेला प्रयत्न आजही महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातून प्रत्येक व्यक्तीच्या जगण्या - बोलण्यातून व्यक्त होतो .संत तुकाराम वैदिक धर्म परंपरेला नकार देत त्यात असलेली अध्यात्मिक व सामाजिक विषमता नाकारताना

दिसतात . मध्ययुगीन कालखंडाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर हे कार्य म्हणावे तितके सोपे नव्हते . त्याची किंमतही या संतांना चुकवावी लागलेली आहे -

"धर्माचे पालन । करणे पाखंड खंडन ॥
हेची आम्हा करणे काम । बीज वाढवावे नाम ॥ " ( ४ )

या संत तुकारामांच्या विचारातून त्यांचे एकूण कार्य आणि कर्तृत्व आपल्या लक्षात येते . महाराष्ट्र विविध जाती आणि धर्मामध्ये दुभंगला असताना सुद्धा मराठी स्वराज्याची प्रेरणा इथल्या मातीमध्ये रुजविण्याचे ऐतिहासिक महान कार्य या संतांनी केलेले आहे . या संतांची ही परंपरा आजतागायत मराठी मातीमध्ये चालू आहे . किर्तन आणि अभंगाच्या माध्यमातून सामान्य माणसांच्या तनाची व मनाची शुद्धी करण्याची शक्ती वारकरी संप्रदायाने आजही टिकवून ठेवलेली आहे .विसाव्या शतकात राष्ट्रसंत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य ही नामदेव -तुकारामाच्या परंपरेला पुढे नेणारे ठरले .

संतांच्या माध्यमातून केवळ सामान्य माणसांची अध्यात्मिक शक्तीच प्रगत झाली नाही तर डोळस सामाजिक व राजकीय दृष्टी प्राप्त झाल्यामुळे विसाव्या शतकात महाराष्ट्राची ओळख संपूर्ण देशभर परिवर्तनवादी आणि प्रबोधन परंपरेला प्रेरणा देणारे राज्य म्हणून झाली . या पाठीमागची ऐतिहासिक पार्श्वभूमी या संतांनी तयार केल्यामुळेच तयार केल्यामुळेच शक्य झाली . म्हणून मराठी संत परंपरा तिचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व आजही नव्या पिढीला प्रेरणा देणारे आहे

**संदर्भ सूची :**

१ .देशपांडे अ . ना . ,प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग पहिला ,व्हीनस प्रकाशन पुणे, आवृत्ती दुसरी जानेवारी १९९५ ,पृष्ठ क्रमांक २३८

२ . जोशी महादेव शास्त्री पंडित (संपादक ) , भारतीय संस्कृती कोश दहावा खंड , भारतीय संस्कृती कोश मंडळ पुणे ,तृतीय आवृत्ती जुलै२००२ ,पृष्ठ क्रमांक ४६८

३. श्री नामदेव गाथा , महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई ,प्रकाशन ९ नोव्हेंबर १९७० , पुनर्मुद्रन जून २००८, पृष्ठ क्रमांक ६८१

४ . मोरे सदानंद डॉ . , तुकाराम दर्शन , गाज प्रकाशन अहमदनगर , द्वितीय आवृत्ती ५ सप्टेंबर २००१ ,पृष्ठ क्रमांक ६७१